कृपया प्रसिद्धीसाठी

**जागतिक बँकेच्या व्यापार सुलभतेमधील अहवालामध्ये भारताने १०० वा क्रमांक पटकवल्याबद्दल क्रेडाई - एमसीएचआयतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन**

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा व्यापक दूर दृष्टीपणा, माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे उत्तम नेतृत्व आणि मुंबई महानगरपालिकेचे अध्यक्ष श्री अजॉय मेहता यांची तत्पर कार्यप्रणाली यामुळे महाराष्ट्रात 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'ने बळ पकडले. आणि आज ही परिस्थिती आहे की 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'मध्ये भारत यंदा जागतिक बँकेच्या जगातील देशांच्या क्रमवारीत १३०व्या स्थानावरून १००वे स्थान पटकावले आहे. याबद्दल क्रेडाई - एमसीएचआय मनापासून आभारी आहे.

क्रेडाई-एमसीएचआयतर्फे सन्माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई महापालिका आयुक्त श्री अजॉय मेहता यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. गुंतवणुकदार-अनुकूल असा उपक्रम सुरू करण्यासाठी राज्य सरकारने महत्वाची भूमिका बजावली आणि एक अढळ स्थान निर्माण केले. याचाच परिणाम आज 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'मध्ये भारताने एका वर्षात ३० पायऱ्यांची उडी मारली. आणि शंभरी गाठली. राज्यात 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' कार्यान्वित करण्यासाठी राज्यसरकारने उत्कृष्ठ कार्यपद्धती राबवली. त्यामुळे भारताला हे यश मिळण्यामध्ये महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे.

बांधकाम आणि मालमत्तासंबंधातील वेगवेगळे परवाने मिळवण्यासाठी वेळ वाया जायचा. मात्र आता या प्रक्रियेमुळे परवाने कमी तर झालेच पण यात सुलभताही आली. परिणामी त्याच्या मुदतीमध्ये मोठ्याप्रमाणात कपात झाली याची मुंबई साक्षिदार आहे.
महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महापालिकेबरोबर क्रेडाई-एमसीएचआयच्या व्यवस्थापकीय समितीने केलेल्या अथक परिश्रमामुळे 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस'ची यशस्वीरित्या अंमलबजावणी होई शकली. संघटनेने पुरवलेली माहिती माननीय मुख्यमंत्री आणि मुंबई महापालिका अध्यक्षांनी स्विकारली आणि कामाचे कौतुकही केले.
भारताच्या सक्षमीकरण करण्याच्या या अद्भूत कामाबद्दल माननीय मुख्यमंत्री आणि मुंबई महापालिकेच्या आयुक्तांचे क्रेडाई-एमसीएचआयच्या संपूर्ण व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले आणि आभार मानले.

महाराष्ट्र शासनाने केलेल्या या सुधारणांमुळेच ही मोठी उडी भारताला घेता आली आहे. हा दुर्मिळ पराक्रम प्राप्त करण्यामध्ये महाराष्ट्राची महत्वाची भूमिका आहे.

Photo Caption: **श्री. धर्मेश जैन, त्वरीत माजी अध्यक्ष यांच्या हस्ते माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करतांना सोबत डा-उ - श्री नवीन माखिजा, विशेष प्रकल्प, श्री. संदिप रुणवाला, संयुक्त सचिव, श्री. नयनेश शहा, उपाध्यक्ष, श्री बोमन इराणी, उपाध्यक्ष, श्री. व्योमेश शहा, माजी अध्यक्ष. उ-डा - श्री. दिपक गोराडीया, उपाध्यक्ष, श्री नयन भेडा, समन्वयक, श्री डॉम्निक रोमेल, सचिव, श्री एस एस हुसैन, विशेष कार्यकारी अधिकारी. क्रेडाई-एमसीएचआय.**